
मंगळवार, २२ फेब्रुवारी २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २१६
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## देशात १२ ते १८ वयोगटासाठी कोरोना लसीला मंजुरी



**नवी दिल्ली :** भारतीय औषध महानियंत्रक (डीसीजीआय) यांनी १२ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांसाठी कोरोनावरील कोर्बेव्हॅक्स या लसीच्या वापरास मंजुरी दिली आहे. त्यामुळे लहान मुलांसाठी भारतात कोर्बेव्हॅक्स ही आणखी एक लस उपलब्ध झाली असून येत्या काळात १२ ते १५ वर्षे वयोगटातील मुलांचे लसीकरण सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे लसीकरण मोहिमेची व्याप्ती आणखी वाढणार असून १२ वर्षांवरील सर्वांनाच कोविड प्रतिबंधक लसीचे संरक्षण मिळणार आहे. भारतात कोविडवर लहान मुलांसाठी सध्या कोव्हॅक्सिन ही एकमेव लस उपलब्ध आहे. १५ ते १८ वयोगटातील मुलांना ही लस दिली जात आहे. त्यात आता कोर्बेव्हॅक्स या लसीला मान्यता मिळाल्याने व ही लस १२ ते १८ वयोगटातील मुलांना देता येणार असल्याने कोविड प्रतिबंधक लसीकरण मोहिमेला अधिक वेग येणार आहे.

**अंतरंग**

वॉटर टॅक्सीचे दर कमी करा -आमदार मंदा म्हात्रे/३

पत्रकारांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण/५

भारताचा ग्रँडमास्टर प्रज्ञानंदने बलाढ्य कार्लसनला हरवले/६

# तिसऱ्या आघाडीचा प्रयोग अनेकदा फसलाय

### ■ देवेंद्र फडणवीस यांची सूचक प्रतिक्रिया

**मुंबई : प्रतिनिधी**

तेलंगणचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी रविवारी मुख्यमंत्री ठाकरे यांच्या निमंत्रणावरून त्यांची मुंबईत भेट घेतली आणि भाजपविरोधी तिसऱ्या आघाडीसंदर्भात चर्चा केली. यावर राज्याचे विरोधी पक्षनेते आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

प्रसारमाध्यमांशी बोलताना विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केसीआर-ठाकरे भेटीवर थेट बोलणे टाळले. ते म्हणाले की, मी पत्रकार परिषद ऐकली नाही, पण एखाद्या राज्याचे मुख्यमंत्री येऊन दुसऱ्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांना येऊन भेटणे यात काही नवीन गोष्ट नाही. मी मुख्यमंत्री असतानाही तेलंगणचे मुख्यमंत्री भेटण्यासाठी आले होते. त्यामुळे याच्यात फार काही वाटत नाही.

भाजपच्या विरोधाची सुरुवात महाराष्ट्रातून होईल असे या भेटीवेळी सांगण्यात आल्यासंबंधी विचारले असता



फडणवीस म्हणाले की, या सगळ्या मंडळींनी मागील लोकसभेतही हातात हात घालून मोठी आघाडी तयार केली, पण त्याचा काही परिणाम झाला नाही. उत्तर प्रदेशसह देशाच्या विविध राज्यांमध्ये त्यांनी हा प्रयोग करून पाहिला, मात्र त्यांचा हा प्रयोग फसला होता.

खरे म्हणजे तेलंगणात आता टीआरएसचीच स्थिती वाईट आहे. मागील लोकसभेत तेथे भाजपच्या चार जागा निवडून आल्या. पुढील लोकसभेत तेलंगणात भाजप पहिल्या क्रमांकाचा पक्ष असेल, असा विश्वास या वेळी फडणवीस यांनी व्यक्त केला.

### ठाकरे सरकारकडून सुडाचे राजकारण

केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या मुंबईतील बंगल्यावरील कारवाईसंबंधी विचारले असता विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, ठाकरे सरकार सुडाचे राजकारण करीत आहे. या सरकारला करायचे असेल ते त्यांनी करावे. न्यायालय आहे. ते योग्य निर्णय घेईल. दरम्यान, शिवसेनेकडून करण्यात आलेल्या टीकेसंबंधी फडणवीस म्हणाले की, रोज काय होत आहे हे सगळे उघड्या डोळ्यांनी पाहत आहेत. राणेंवर, त्यांच्या मुलांवर होणारी कारवाई, किरीट सोमय्यांचा कसा जीव घेण्याचा प्रयत्न सुरू आहे, रवी राणा या सगळ्या गोष्टी जनता पाहत आहे. सुडाचे राजकारण कोण करतेय हे माहिती आहे. त्यांची निराशा सुडाच्या राजकारणातून बाहेर येतेय.

## चारा घोटाळा प्रकरण
# लालूंना पाच वर्षांची शिक्षा

**रांची : वृत्तसंस्था**

बहुचर्चित चारा घोटाळ्यातील एका प्रकरणात माजी केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रीय जनता दलाचे अध्यक्ष लालू प्रसाद यादव यांना विशेष सीबीआय न्यायालयाने पाच वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. त्याचबरोबर ६० लाखांचा दंडही त्यांना ठोठावण्यात आला आहे. लालूंविरोधातील हा पाचवा चारा घोटाळा आहे.



डोरांडा कोषागारातून अवैधरित्या पैसे काढल्याप्रकरणी लालूंना ही शिक्षा सुनावण्यात आली आहे. १५ फेब्रुवारी रोजी रांची येथील विशेष सीबीआय न्यायालयाने लालूंसह ३८ आरोपींना दोषी ठरवले होते. यानंतर लालूंची तुरुंगात रवानगी करण्यात आली. ते रिम्समधूनच कोर्टात उपस्थित होते. त्यांच्यासह इतर दोषींना व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून शिक्षा सुनावण्यात आली.

यापूर्वी लालूप्रसाद यांना चारा घोटाळ्याशी संबंधित चार प्रकरणांमध्ये १४ वर्षांची शिक्षा झाली होती. ही प्रकरणे दुमका, देवघर आणि चाईबासा कोषागारातून पैसे काढण्याशी संबंधित होती. आता लालूंना डोरंडा कोषागार प्रकरणात पाच वर्षांची शिक्षा झाली आहे. त्यांना भा. दं. वि. कलम ४०९, ४२०, ४६७, ४६८, ४७१ याशिवाय कट रचण्याशी संबंधित कलम १२० ब आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत न्यायालयाने दोषी ठरवले.

# कोकण मर्कंटाईल बँकेची पनवेलमध्ये शाखा
## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन





(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**कोकण मर्कंटाईल बँकेच्या माध्यमातून ग्राहकांना जलद गतीने व्यवहार होण्याच्या दृष्टिकोनातून उपाययोजना करण्यात येत आहे. या बँकेच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सुविधांमुळे ही बँक अल्पसंख्याक समाजाच्या ५० बँकांपैकी एक सर्वोत्कृष्ट बँक बनली आहे.**
**-आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष, भाजप**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण मर्कंटाईल बँकेच्या पनवेल शाखेचे उद्घाटन भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. २१) करण्यात आले. शहरातील कच्छी मोहल्ल्यात महात्मा गांधी मार्गावर ही बँक शाखा सुरू झाली असून तेथे ग्राहकांना एटीएमचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या कार्यक्रमास नगरसेवक मुकीद काझी, बँकेचे उपाध्यक्ष असिफ दादन, विभागीय संचालक समद अधिकारी, अजगर दबेर, रायगड विभाग अध्यक्ष मुस्तफा पोंजेकर, कोकणी डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष वसीम फोफलनकर, पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इक्बाल काझी, अध्यक्ष शाम्स एज्युकेशनचे अध्यक्ष अशफाक खामकर, बँकचे सहसंचालक खलील दाबेर, नदीम दादन, रमिझ मुल्ला, जाहिद पटेल, नाविद पटेल, रामजी मुल्ला, अतिक खोत, अस्लम मुन्शी, नझीम नालखांडे, अ‍ॅड. कडव, अ‍ॅड. यशवंत भोपी, अहमद फकीह, अ‍ॅड. परवेझ खान, तलाल मुल्ला आदी उपस्थित होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी बँकेच्या पदाधिकाऱ्यांना या २५व्या शाखेनिमित्त शुभेच्छा दिल्या.

## निवडक

### नांदेडमध्ये भीषण अपघातात नववधूसह पाच जणांचा मृत्यू

**नांदेड :** विवाहसोहळा उरकून परतणारी वऱ्हाडाची टाटा मॅजिक गाडी आणि टेम्पो यांची सोमवारी (दि. २१) भोकर-हिमायतनगर राष्ट्रीय महामार्गावर धडक होऊन पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये नववधूचाही समावेश असून सहा जण जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

### कर्नाटकमध्ये बजरंग दलाच्या कार्यकर्त्याची हत्या

**बंगळुरू :** कर्नाटकमध्ये बजरंग दलाचा कार्यकर्ता हर्षा (वय २३) याची हत्या करण्यात आली आहे. शिवमोग्गा येथे रविवारी (दि. २०) ९.३०च्या सुमारास ही घटना घडली. हत्येनंतर परिसरात तणाव असून जमावबंदी लागू करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालये दोन दिवस बंद ठेवण्यात येणार आहेत.


# घोटाळेबाज शिशिर धारकर यांना पेण पालिकेबाबत बोलण्याचा अधिकार नाही

### भाजप नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी सुनावले

**पेण : प्रतिनिधी**

माजी नगराध्यक्ष शिशिर धारकर यांनी पेणमधील नागरिक आणि पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांना देशोधडीला लावले आहे. त्यांना पेण पालिकेबाबत बोलण्याचा अधिकार नाही तसेच त्यांचे आमदार रविशेठ पाटील यांच्याबाबत बालिश आणि बेताल वक्तव्य भाजप कदापि सहन करणार नाही. त्यांना जशास तसे उत्तर दिले जाईल, अशा शब्दांत पेण भाजप आणि नगरसेवकांनी धारकर यांना सुनावले आहे.

शिशिर धारकर यांनी आमदार रविशेठ पाटील यांच्यावर केलेल्या आरोपांना उत्तर देण्यासाठी आणि निषेध करण्यासाठी नगरसेवक अजय क्षीरसागर आणि भाजपच्या वतीने सोमवारी (दि. २१) पेण येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या वेळी प्रशांत ओक, भाजप युवा मोर्चा पेण शहर अध्यक्ष मितेष



शाह, माजी नगरसेवक बाळू जोशी उपस्थित होते. त्यांनी धारकरांचा जोरदार समाचार घेतला.

ओक, शाह, जोशी यांनी सांगितले की, पेणकरांचा विश्वास आमदार रविशेठ पाटील यांच्यावर आहे हे नऊ हजार मतांची आघाडी पेणमधून देऊन जनतेने सिद्ध केले आहे. ज्या दिवशी पेण अर्बन बँक बुडाली त्याच दिवशी संध्याकाळी धारकर यांनी माजी कॅबिनेट मंत्री रविशेठ पाटील यांच्याकडे येऊन लोटांगण घालून मदत मागितली होती. त्या वेळी पक्षीय राजकारण न करता रविशेठ पाटील यांनी केवळ ठेवीदारांच्या हिताचा विचार करून तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण आणि तत्कालीन सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांची गाठ घालून दिली. त्या वेळी शिशिर धारकर यांनी आपण दर महिन्याला ५० कोटी बँकेत भरून ठेवीदारांचे पैसे परत करू, असे कबूल केले होते, मात्र तो शब्द धारकरांनी पाळला नाही. त्यामुळे बँक बुडून अनेक ठेवीदारांचे संसार उद्ध्वस्त झाले ही वस्तुस्थिती आहे.

शहरातील रिंग रोडसाठी केलेले आरक्षण हे धारकर यांच्याच कार्यकाळात संतोष शुंगारपुरे नगराध्यक्ष असताना झालेले आहेत. त्यामुळे त्यात बदल करण्याचा अधिकार आम्हाला नाही, असे नगरसेवक क्षीरसागर यांनी सांगितले. **(पान २ वर..)**

## ठाकरे सरकारने सत्तेचा गैरवापर करू नये -ना. रामदास आठवले

**मुंबई : प्रतिनिधी**



केंद्रीय मंत्री नारायण राणे त्यांच्या घरावर कारवाई करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मुंबई महापालिकेने राणे यांच्या घराची सोमवारी (दि. २१) झाडाझडती घेतली. ठाकरे सरकारने सत्तेचा गैरवापर करू नये, अशी जनतेची भावना आहे. ती समजून घेऊन सरकारने सूडबुद्धीचे राजकारण थांबवावे, असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले आहे.

केंद्र सरकारकडून ईडी आणि सीबीआय चौकशीचा वापर सूडबुद्धीतून केला जातो असा बिनबुडाचा आरोप केंद्र सरकारवर विरोधकांकडून केला जातो, मात्र ईडी आणि सीबीआय या स्वतंत्र स्वायत्त संस्था आहेत. या संस्था त्यांच्या पद्धतीने आरोपांची चौकशी करीत असतात. त्यांच्या कारवाईशी केंद्र सरकारच्या राजकारणाचा काही संबंध नसतो, मात्र राज्यात ठाकरे सरकारच्या काळात ज्या कारवाया चालू आहेत तसेच ज्या आरोपांचे राजकारण सुरू आहे ते महाराष्ट्राच्या उज्ज्वल प्रतिमेला शोभणारे नाही. मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या काळात सत्ताधारी पक्षाकडून होणारे आरोप आणि कारवाई ही किती नैतिक पातळीला आहे याचा विचार केला पाहिजे, असा सल्ला ना. रामदास आठवले यांनी दिला आहे.

# यंदा मान्सून सामान्य राहणार

### ■ ‘स्कायमेट’चा अंदाज



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

या वर्षीच्या मान्सून अंदाजाची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. यंदा देशात मान्सून सामान्य राहील, असा अंदाज स्कायमेट संस्थेने वर्तवला आहे.

हवामान अंदाज वर्तवणारी खासगी एजन्सी स्कायमेटने सन २०२२साठी प्राथमिक मान्सून अंदाज जारी केला आहे. त्यानुसार यंदा मान्सून सामान्य राहणार असून तो सरासरीच्या ९७ ते १०४ टक्के असेल.

पूर्वानुमानानुसार सुरुवातीच्या काळात मान्सूनची स्थिती चांगली असेल. या काळात भरपूर पाऊस पडेल. त्याचबरोबर हा हंगामी काळ शेतकऱ्यांसाठी अनुकूल राहील, असे ‘स्कायमेट’चे उपाध्यक्ष आणि मुख्य हवामानशास्त्रज्ञ डॉ. महेश पलावत यांनी सांगितले.

पावसाळ्याच्या सुरुवातीला चांगला पाऊस पाहायला मिळेल. ऑगस्ट आणि सप्टेंबरच्या मध्यात कमी पाऊस पडू शकतो, परंतु मान्सून सामान्य राहण्याचा अंदाज आहे, असे डॉ. पलावत म्हणाले. एप्रिल महिन्यात ‘स्कायमेट’कडून मान्सूनबाबतचा सविस्तर अंदाज वर्तविला जाणार आहे.

# अमिना इलेव्हन संघ आयपीपीएलचा मानकरी

### सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते बक्षीस वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयपीपीएल क्रिकेट स्पर्धेत अमिना इलेव्हन या संघाने विजेतेपद पटकाविले आहे. इंटर पनवेल क्रिकेट कमिटी आणि ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि. कंपनीच्या वतीने शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानावर इंटर पनवेल प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा आयोजिण्यात आली होती. या स्पर्धेचे बक्षीस वितरण सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. २०) झाले.

दोन दिवसीय आयपीपीएलमध्ये पनवेलमधील आठ संघांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेतील सामने रंगतदार झाले. दर्शकांनी उपस्थित राहून रोमहर्षक लढतींचा आनंद घेतला. या स्पर्धेत युनायटेड इलेव्हन संघ उपविजेता ठरला. सर्वोत्कृष्ट फलंदाज म्हणून वसीम पटेल आणि मालिकावीर म्हणून अश्विनी कोट्याल यांची निवड करण्यात आली. विजेते




या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

संघ आणि चमकदार कामगिरी करणारे खेळाडू यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभास नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, अजय बहिरा, मुकीद काझी, उद्योजक राजू गुप्ते, उल्लास झुंझारराव, प्रशांत झुंझारराव, इंटर पनवेल क्रिकेट कमिटीचे अध्यक्ष सुमित झुंझारराव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, खेळाडू आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

## खारघरमध्ये महिला कावड यात्रा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

विश्वमांगल्य सभा खारघर या संस्थेच्या वतीने येत्या रविवारी (दि. २७) दुपारी २.३० वाजता महिला कावड यात्रा आयोजित करण्यात आली आहे. खारघर सेक्टर ७ मधील उत्सव चौक येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

विश्वमांगल्यतर्फे प्रथमच या महिला कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात महिला पारंपरिक वेशभूषा करून उत्सव चौकात एकत्रित जमणार आहेत. त्यानंतर कावड यात्रा पुढे शिवमंदिरात पोहचेल. मंदिरात श्री शिवमहिम्न स्तोत्र पठण व शिवजींवर कावडने जलाभिषेक केला जाईल. मंदिरासमोरील मैदानावर मार्गदर्शनपर कार्यक्रम होणार आहे. या भव्य कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर तसेच नगरसेविका व इतर लोकप्रतिनिधींची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

## पनवेल महापालिका क्षेत्रात कोविड लसीकरण वेगात

# शंभर टक्के नागरिकांचा दुसरा डोस पूर्ण

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका क्षेत्रातील १८ वर्षांवरील नागरिकांचा १०० टक्के कोविड लसीकरणाचा दुसरा डोस पूर्ण झाला आहे. महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर व आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका प्रशासनाने कोरोना प्रतिबंधात्मक दुसऱ्या डोसचेही १०० टक्के लसीकरण पूर्ण होऊ शकले.

पनवेल महापालिका क्षेत्रात १६ जानेवारी २०२१ रोजी कोविड लसीकरणास सुरुवात झाली. पहिल्या टप्प्यात आरोग्य कर्मचाऱ्यांचे, दुसऱ्या टप्प्यात पोलीस, महसूल विभाग आदी कर्मचाऱ्यांचे, तिसऱ्या टप्प्यात ज्येष्ठ नागरिकांचे लसीकरण करण्यात आले. यानंतर ४५ ते ६० वयोगटातील, चौथ्या टप्प्यात १८ वर्षांवरील तर आता पुढील टप्प्यात १५-१८ वयोगटातील मुलांचे लसीकरण सुरू आहे.

ग्रामीण भागातील जनतेसाठी प्रत्येक गाव-पाड्यांवर लसीकरण सत्र उभारण्यात आले. वारांगना, बेडरिडन, गर्भवती, दिव्यांग अशा विविध घटकांना सामावून त्यांचे विशेष लसीकरण आयोजित करण्यात आले. वृध्दाश्रम, तळोजा जेल याठिकाणीही लसीकरण करण्यात आले. १५० खाजगी लसीकरण केंद्रांना मान्यता देण्यात आली. मिशन कवच कुंडल अंतर्गत आयईसी, बॅनर, माईकिंग, गणेशोत्सव, नवरात्रोत्स्व अंतर्गत लसीकरणाचे कॅम्प लावण्यात आले. जवळपास ७० टीम कार्यरत करून सोसायटी निहाय व एरीया निहाय मोबाइल लसीकरण बूथ उभारण्यात आले. ग्रामीण भागात ३० ठिकाणी आठवड्यातील ठराविक दिवशी लसीकरणाची सोय करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या 'हर घर दस्तक' अभियानांतर्गत घरोघरी जाऊन सर्वेक्षण सुरू करण्यात आले.

वॉर रूमद्वारे लसीकरणास प्रवृत्त करण्यात आले. बाजार पेठांमध्ये, प्रसारमाध्यमाद्वारे जनजागृती करण्यात आली. सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने भोंगा गाडी व त्यासोबत लसीकरण वाहिका (वॅक्सीनेशन व्हॅन) सर्वत्र फिरविण्यात आली.

सध्या १५ ते १८ वयोगटातील लसीकरणावर महापालिका भर देत असून पहिल्या व दुसऱ्या डोसचे शाळांशाळांमध्ये कॅम्प लावण्यात येत आहेत. तसेच बुस्टर डोसचेही लसीकरण सुरू आहे.



**पनवेल : ग्रामस्थ मंडळ टेंभोडे व महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने टेंभोडे येथील हनुमान मंदिरात श्री सत्यनारायणाच्या महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी पं. स. सदस्य तथा भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सरचिटणीस प्रतिभा भोईर, लीना पाटील, प्रणाली घरत यांनीही दर्शन घेतले.**

# पनवेलमध्ये जय मल्हार खानावळीचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



गेली सहा वर्षे चोखंदळ खवय्यांची क्षुधाशांती करणारे भूषण हजारे यांनी जय मल्हार या घरगुती खानावळीची नवीन जागेत सुरुवात केली आहे. सोमवारी (दि. २१) भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते फीत कापून जय मल्हार घरगुती खानावळीचे उद्घाटन झाले. हार्ट ऑफ पनवेल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टपाल नाका येथे श्री शनि मंदिरासमोर जय मल्हार घरगुती खानावळ खवय्यांच्या सेवेत रुजू झाली आहे.

या वेळी नगरसेवक राजू सोनी, संजय कर्पे, यतिन पिंपळे, राजेश राणे, विद्या निजामपूरकर, निलेश बेत्ती, प्रशांत कर्पे, सचिन रणदिवे, हजारे कुटुंबीयांचे आप्तेष्ट व हितचिंतक, सुप्रसिद्ध क्रिकेट संघ नानू फुलवातचे तमाम खेळाडू व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटनाच्या वेळी प्रतिक्रिया देताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, भूषण हजारे व त्यांच्या परिवाराने सुरू केलेल्या या उपक्रमास मी मनःपूर्वक शुभेच्छा देतो. यापूर्वीदेखील त्यांनी अत्यंत चविष्ट, रुचकर, खमंग आणि सुग्रास अन्नपदार्थांद्वारे पनवेलमधील खवय्यांना मेजवानी दिली आहे. हल्लीच्या दिवसात नोकरी अथवा व्यवसाय यामुळे बाहेर भोजन घेण्याचे प्रमाण वाढीस लागले आहे. काही व्यावसायिक लोक याचा फायदा घेतात, परंतु त्यांच्याकडून वापरले जाणारे कृत्रिम मसाले, भेसळयुक्त रंग यांच्यामुळे आपण व्याधीग्रस्त होऊ शकतो. अर्थातच त्यामुळे बाहेर भोजन घेणाऱ्यांची घरगुती पद्धतीच्या खानावळींना पहिली पसंती असते. भूषण हजारे व शीतल हजारे हे जय मल्हार या घरगुती खानावळीद्वारे चोखंदळ ग्राहकांना, खवय्यांना खमंग व रुचकर भोजन प्रदान करतील, असा विश्वास मला वाटतो.

भूषण हजारे आणि शीतल हजारे यांच्या जय मल्हार या घरगुती खानावळमध्ये शाकाहारी आणि मांसाहारी पदार्थांची रेलचेल असणार आहे. मटण मिसळ, कोंबडी वडे, सोडे मसाला, खिमा या डिशेस त्यांच्या खनावळीच्या आयकोनीक डिशेस म्हणून ओळखल्या जातात. तर फिश मसाला, पाया सूप आवर्जून खाल्लेच पाहिजेत इतके चविष्ट असतात. सकाळच्या सत्रात बटाटे वडा, भजी, मिसळ, मेदुवडा, इडली असे पदार्थदेखील सर्व्ह केले जाणार असल्याची माहिती प्रीत हजारे यांनी दिली.

# खांदा कॉलनी भाजपतर्फे हळदीकुंकू समारंभ उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष खांदा कॉलनीच्या वतीने हळदीकुंकू समारंभ रविवारी (दि. २०) आयोजित केला होता. सेक्टर ८ येथील श्रीकृपा हॉलमध्ये झालेल्या या समारंभाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी महिलांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. अनेक मंडळांनी मंगळागौरीचे खेळ सादर केले. या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेच्या उपमहापौर सीताताई पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



या समारंभाला नगरसेवक एकनाथ गायकवाड, नगरसेविका चंद्रकला शेळके, माणिका गायकवाड, विद्या यादव, खांदा कॉलनी सरचिटणीस आशा मुंडे, विद्या आंब्रे, अनिता रासकर, स्वाती नांगरे, शुभांगी रायते, मनीषा पाटील, मनीषा कोळी, लता बंडगर, सीमा निकम, संध्या जाधव, सोनाली सावंत, वंदना म्हात्रे, सुनीता गुरव, शोभा मोरे, विनोदा शेट्टी, अनुराधा शिंदे, वारेजा गुजराल, सुनीता चव्हाण, अनिता पगारे, प्रभाग क्रमांक १५ अध्यक्ष शांताराम महाडीक, ओ.बी.सी सेल अध्यक्ष रामनाथ पाटील, माजी सरपंच शशिकांत शेळके, दीपक जांभळे, खांदा कॉलनी उपाध्याक्ष सचिन गायकवाड, अवधेश शुक्ला, सचिन मोरे, मच्छिंद्र वर्तक, युवराज बेंसडे, अंकुश खरमाडे, आकाश सोनावळे, मिथुन दुर्गे, चेतन जाधव यांच्यासह आदी उपस्थित होते.

पान १ वरून

## घोटाळेबाज शिशिर धारकर यांना पेण पालिकेबाबत बोलण्याचा अधिकार नाही

सफाई ठेक्यात कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार झालेला नाही. १० वर्षांपूर्वी धारकरांची सत्ता असताना ६० ते ८० रुपये सफाई कामगारांना रोज दर दिला जायचा, परंतु आमची सत्ता आल्यानंतर आम्ही या गोरगरीब सफाई कामगारांना न्याय मिळवून दिला. नियमाप्रमाणे त्यांना रोज ३५० ते ४०० रुपये पगार दिला जातो. त्यामुळे १० वर्षांपूर्वी असलेला ३४ लाखांचा ठेका हा आता तीन कोटींवर गेला असल्याचे नगरसेवक क्षीरसागर यांनी स्पष्ट केले.

पेण शहरातील नागरिकांना प्रत्येक वॉर्डमध्ये शुद्ध आणि मुबलक पाणीपुरवठा वेळेवर होत आहे. नगराध्यक्षा प्रितम पाटील आणि आमदार रविशेठ पाटील यांच्या नेतृत्वात पेण शहरात डांबरीकरण केलेले रस्ते, गॅस पाइपलाइन, पथदिवे, प्रत्येक प्रभागात स्वच्छता रोज होत असते. विजेचे नवीन खांब आणि पाण्याची नवीन पाइपलाइन टाकण्याचे काम, त्याचबरोबर नागरिकांना लागणाऱ्या सर्व मूलभुत गरजा नगर परिषदेकडून पुरविल्या जात आहेत. जे धारकरांना त्यांच्या सत्तेच्या २५ वर्षांत जमले नाही त्याच्या १०० पटीने विकास आम्ही करून दाखविला आहे, असे या वेळी सांगण्यात आले.

पेण नगर परिषदेवर शिशिर धारकर यांची सत्ता असताना शहराच्या पाणीपुरवठा योजनेकरिता शासनाकडून आलेले पाच कोटी रुपये तत्कालीन नगराध्यक्ष संतोष शुंगारपुरे यांनी बेकायदेशीररित्या शासकीय बँकेत न ठेवता ही रक्कम तत्कालीन मुख्याधिकारी यांच्यावर दबाव टाकून पेण अर्बन बँकेत ठेवली होती. त्यानंतर बँक बुडाली. त्यामुळे शहराची पाणीपुरवठा योजना अडकून राहिली होती, परंतु माजी कॅबिनेट मंत्री व विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांनी विशेष प्रयत्न करून पाणीपुरवठा योजनेसाठी पुन्हा निधी उपलब्ध करून दिल्याने आज पेणच्या नागरिकांना मुबलक पाणी मिळत आहे, असे उपस्थितांनी नमूद केले.

शिशिर धारकर यांनी केलेले बिनबुडाचे आरोप सिद्ध करावेत; अन्यथा भारतीय जनता पक्ष त्यांना सडेतोड उत्तर देईल तसेच पालिकेच्या आगामी निवडणुकीत पेणची जनता बँक बुडव्यांना हद्दपार करेल, असा विश्वास या वेळी भाजप युवा मोर्चा पेण शहर अध्यक्ष मितेष शाह यांनी व्यक्त केला.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मूळ मालक यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे लोणिवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १४ | २/अ/२ | ०-२४-००<br>पो.ख ०-००-५०<br>एकूण ०-२४-५० | ४.६१ | श्री. सुशिल सुरेश पाटील,<br>श्री. रविंद्र सुरेश पाटील,<br>श्री. जगदिश सुरेश पाटील,<br>श्रीम. प्रियंका महेश केणी,<br>श्री. सुभाष सिताराम पाटील,<br>श्री. सुरेंद्र सिताराम पाटील,<br>श्रीम. राजश्री बारकू तरे,<br>श्रीम. निलम प्रशांत पाटील,<br>श्रीम. वैशाली अलंकार ठाणगे |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारचा हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दिनांक :- २१/०२/२०२२**

**सही/-**
**ॲड. एस. के. राणे**
पत्ता : ऑफीस नं. १२३, पहिला मजला, म्युन्सीपल कॉम्प्लेक्स, भाजी मार्केटजवळ, पनवेल, जि. रायगड ४१०२१७,
मो.नं. ९८१९८६९२१२

**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**
**ऑनलाईन निविदा सूचना क्रमांक ९४ सन २०२१-२०२२ (द्वितीय सूचना)**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पोलादपूर वाई सुरुर रस्ता रामा-१३९ किमी ०/०० ते १८/०० मध्ये क्रॅश बॅरीअर्सचे बांधकाम करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४ मार्ग व पुल, ०३ राज्य मार्ग) | २१९३४७१० | १५०००० | २४००/- | ०६ महिने | इतर |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२२/०२/२०२२** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **०४/०३/२०२२** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | निविदापुर्व बैठक (दुसरी वेळ) | मा. अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, कोकणभवन, नवीमुंबई यांचे कार्यालयात दिनांक २५/०२/२०२२ वेळ १२.०० वाजता |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, कोकणभवन, नवीमुंबई यांचे कार्यालयात दिनांक **०८/०३/२०२२** वेळ ११.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/७२९**
**दिनांक : १७/०२/२०२२**

**सही/**
**(आर. के. बामणे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM RE-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:- EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech/Tender-32/2021-22 Dtd.22.02.2022 RFX No.7000022306** | **Sub:-** Invitation of SRM Re-Tender for anticorrosive coating /painting with chemical resistance coating of 50 MVA TF-1, TF -2 & TF-3 at 220/22 KV Mahad S/s , 100 MVA ICT-1 at 220/100/22 kV Kandalgaon S/s, 50 MVA T/F-I at 100/22 KV Roha S/s and under EHV O&M Division, Mahad | **Rs. up to 24,94,151/- (Including GST+ 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST+1% Labour CESS.

Bid submission is from **22.02.2022 @ 00:00 hrs to 01.03.2022 @23:59Hrs** for above tender

For further details visit our website: **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person: -** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 7373101089

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Sanjay O. Katkar)**
**Executive Engineer, EHV (O&M) Dn, Mahad**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Re-Tender Notice**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work

| Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Re-Ten-1/2022-23 (RFX No. 7000022118) | | | Period for submission of E-Bid: 21.02.2022 to 28.02.2022 up to 23:59hrs | | |
|---|---|---|---|---|---|
| **Name of Work: Providing services Housekeeping and Garden Maintenance at 400kV R.S. (O&M) Dn., Kharghar** | | | | | |
| **Estimated Cost** | **EMD (Rs.)** | **Tender Fee (Rs.)** | **Closing Date** | **Technical Opening Date** | **Commercial Opening Date** |
| Rs. **4,83,609.12** (Including GST) | Rs. 5,000/- | Rs.525/- (Including GST) | **28.02.2022** up to 23:59 hrs | **01.03.2022** at 10:00 hrs (If possible) | **01.03.2022** at 10:15 hrs (If possible) |

**Contact Persons:**
1) Mr. S.J.Darekar, Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar, 9619892040
2) Ms. P.C.Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details visit our website **www.mahatransco.in**

1] Tender document can be downloaded by only online from aforesaid website.
2] Eligible contractor should submit their Bid well in advance instead of waiting till last date.

**MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**

**Note:** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - **https://srmetender.mahatransco.in.**

SD/-
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE No.08/2021-22**

The Superintending Engineer (Civil) EHV CCCM Circle, Airoli on behalf of MSETCL (the employer) hereby invites SRM E-tender mentioned below from registered contractors of appropriate class with central or State Govt. /Semi Govt. Department/ PSU and also registered under M.S.E.T.C.L.'s SRM E-Tender registration system on Mahatransco SRM E-Tendering Website.

| Sr.No. | RFx No. | Name of work |
|---|---|---|
| 1 | 7000022220 | Construction of peripheral compound wall / retaining wall for switch yard and colony and concrete road at 220 KV Kandalgaon Substation, Dist. Raigad. |

For further details visit our Website **https://srmetender.mahatransco.in (Guest User)**

**Contact Person:** Deputy Executive Engineer (Civil):
Phone No. (022)-27601622 / Mob. No. 9769978832

**Superintending Engineer (Civil), Airoli**





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**मंगळवार, दि. २२ फेब्रुवारी २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर ■ ७. सेंट्रल रेल्वे, पनवेल

**कोव्हॅक्सिन**

- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+)
- ९. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+ ते १५+)
- १०. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१८+)
- ११. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+ ते १८+)
- १२. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+ ते १८+)
- १३. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+ ते १८+)

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

# वॉटर टॅक्सीचे दर कमी करा

## आमदार मंदा म्हात्रे यांची मेरिटाईम बोर्डाकडे मागणी

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

राज्यातील पहिली अशी जल प्रवासी वाहतूक नवी मुंबई बेलापूर जेट्टी येथून सुरू करण्यात आली, परंतु प्रवासी वाहतूक करताना वॉटर टॅक्सीचे दर सुमारे ८०० ते १२०० रुपयांपर्यंत ठेवण्यात आलेले आहेत. हे दर कमी करावेत, अशी मागणी बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी मेरिटाईम बोर्डाचे अध्यक्ष अमित सैनी यांना पत्र लिहून केली आहे.



आमदार मंदा म्हात्रे यांनी पत्रात म्हटले आहे की, नवी मुंबईतील असंख्य नागरिक हे सर्वसामान्य घरातील आहेत. ठेवण्यात आलेले दर हे सर्वसामान्यांना परवडणारे नाहीत. महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या या बेलापूर जेट्टी येथे पर्यटकांकरिता प्रसाधन गृहे, पाणपोई, फूड स्टॉल अशी कोणतीच सुविधा उपलब्ध नाही, परंतु तरीही वॉटर टॅक्सी कंपनीमार्फत प्रवासी तिकिटातून १० टक्के कर आकारण्यात येत आहे. वॉटर टॅक्सी सध्या नव्याने सुरू असल्याने त्याचे दर कमी ठेवल्यास तसेच आपण लावत असलेला कर हा पाच टक्के केल्यास तिकिटाचे दर परवडून पर्यटकांची संख्या वाढण्यास मदत होईल. व्यवसायही चांगला होईल. तरी वरील गोष्टींचा प्रामुख्याने विचार करून बेलापूर जेट्टी येथे सुरू करण्यात आलेल्या वॉटर टॅक्सीचे प्रवासी दर कमी करण्यात यावेत तसेच बेलापूर जेट्टी येथे लवकरात लवकर इतर तत्सम सेवा सुविधा उपलब्ध करण्यात याव्यात, अशी मागणी बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी मेरिटाइम बोर्डाच्या अधिकाऱ्यांकडे केली आहे.

### *मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीतही मांडला होता मुद्दा*

*बेलापूर जेट्टीच्या उद्घाटनाच्या वेळी केंद्रीय मंत्र्यांसोबत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्हर्च्युअली हजेरी लावली होती. तर उपमुख्यमंत्री अजित पवार व पालकमंत्री एकनाथ शिंदे व राज्यमंत्री अब्दुल सत्तार कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित होते. त्यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी जादा दराचा मुद्दा उपस्थित केला होता. येत्या काळात आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होणार असून त्यावेळी मेरिटाईम बोर्डाला बेलापूर जेट्टीतून प्रवाशांसह चांगला प्रतिसाद लाभणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी म्हटले होते, मात्र या जलवाहतुकीचा आनंद सामान्य नागरिकांना मिळण्यासाठी आत्ताच दर कमी ठेवावेत, अशी मागणी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत केली होती.*

# मराठा समाजाच्या आझाद मैदानावरील उपोषणासाठी आज तातडीची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मराठा समाजाच्या मागण्यांसंदर्भात खासदार संभाजीराजे शनिवार (दि. २६)पासून आझाद मैदानावर आमरण उपोषण करणार आहेत. रायगड जिल्हा पूर्ण ताकदीने संभाजीराजेच्या सोबत आहे. या संदर्भात नियोजनासाठी मंगळवारी (दि. २२) सायंकाळी ५.३० वाजता खालापूर तालुक्यातील दांडफाटा येथील टाकेदेवी मंदिरात मराठा समाजाची बैठक आयोजित केली आहे, अशी माहिती राज्य समन्वयक विनोद साबळे यांनी दिली.

गेल्या दोन वर्षांपासून राजे समाजाच्या प्रमुख मागण्यांसंदर्भात आंदोलन करीत आहेत, तरीही मुख्यमंत्री फक्त आश्वासन देत आहेत. प्रश्न सोडवत नाहीत, म्हणून राजेंना आमरण उपोषण करावे लागत आहे. ही बाब महाराष्ट्रासाठी व समाजासाठी लाजिरवाणी आहे. राज्य सरकारने मागण्या मान्य करून अंमलबजावणी नाही केली तर या सरकारला मराठा समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असेही साबळे यांनी म्हटले आहे.



**पनवेल : राज्य सरकारच्या निष्क्रिय कारभारामुळे मराठा समाजाच्या वतीने खासदार संभाजीराजे उपोषण करणार आहेत. या उपोषणास करंजाडे ग्रामपंचायतीने पाठिंबा जाहीर केला आहे. पाठिंब्याचे पत्र सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी राज्य समन्वयक विनोद साबळे यांना दिले.**

# उरण येथे शिवजयंती उत्साहात





**उरण : वार्ताहर**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत व हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त उरण नगर परिषदेच्या वतीने विमला तलावातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास आमदार महेश बालदी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. नगरसेवक, नगरसेविका यांनीही अभिवादन केले. विमला तलाव येथील गार्डनमध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

या वेळी भाजप तालुका अध्यक्ष तथा नगरसेवक रवी भोईर, नगराध्यक्ष सायली म्हात्रे, शहर अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, मुख्याधिकारी संतोष माळी, नगरसेवक राजेश ठाकूर, नगरसेविका यास्मिन गॅस, दमयंती म्हात्रे, स्नेहल कासारे, संतोष पवार, अधिकारी सुरेश पोसतांडेल, भाजप शहर महिला अध्यक्ष संपूर्णा थळी नगर परिषद कर्मचारी आदी उपस्थित होते.

# द्रोणागिरी किल्ल्यावर विविध धार्मिक उपक्रम



**उरण : बातमीदार**

दुर्ग मावळा प्रतिष्ठान या गड किल्ल्याचे संवर्धन, संरक्षण करणाऱ्या संस्थेतर्फे उरण तालुक्यातील एतिहासिक द्रोणागिरी किल्ल्यावर शिवजयंतीनिमित्त शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. १८, १९ फेब्रुवारी २०२२ असे दोन दिवस शिवजन्मोत्सव निमित्त विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

आगरी कोळी कराडी संघर्ष सामाजिक संस्था, सह्याद्री प्रतिष्ठान उरण विभाग, शिवभक्त प्रतिष्ठान उरण विभाग, शिवशक्ती मित्र मंडळ उरण चारफाटा, योगा विथ पूनम ग्रुप, यान्सी ग्रुप ऑफ लिव्हीस टीम, युवा शिवशक्ती मित्र मंडळ डाऊरनगर, शिवछत्रपती मित्र मंडळ करंजा, अवनी सामाजिक संस्था उरण, डाऊर नगर ग्रामस्थ आणि मित्र परिवार आदी संस्थेचे पदाधिकारी सदस्य या शिवजनमोत्सवात सहभागी झाले होते.

# शिवजयंतीनिमित्त उलगडला शिवरायांच्या शिलेदारांचा जीवनपट

## पनवेल भाजप युवा मोर्चाचा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक तथा महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त भाजप युवा मोर्चा पनवेल शहरच्या वतीने अध्यक्ष रोहित जगताप यांनी शिवरायांच्या शिलेदारांच्या कार्याचा आढावा घेत त्यांचा जीवनपट उलगडला. या शूरवीरांचे कार्यफलक शहरातील वडाळे तलाव परिसरातील रस्त्यावर लावून नागरिकांना माहिती देण्यात आली.

भाजप युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप यांनी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर यांच्या सहकार्याने हा अनोखा उपक्रम राबविला. यामध्ये शिवरायांचे सरसेनापती हंबीरराव मोहिते, तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे, येसाजी कंक, बहिर्जी नाईक, शिवा काशिद, कान्होजी जेधे, हिरोजी इंदुलकर, प्रतापराव गुजर, नेताजी पालकर, कान्होजी आंग्रे, जिवा महाल, फिरंगोजी नरसाळा, मुरारबाजी देशपांडे आणि गुरूवर्य दादोजी कोंडदेव यांचे जीवनकार्य मांडण्यात आले.




नव्या पिढीला या स्वराज्याच्या शिलेदारांचे शौर्य व त्याग माहीत व्हावा आणि त्यापासून काहीतरी करण्याची तरुणाईला प्रेरणा मिळावी यासाठी हा उपक्रम राबविण्यात आल्याची माहिती जगताप यांनी दिली.

# गौरव क्लासेसतर्फे शिवजयंती उत्सव

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

संतोष वर्तक यांच्या गौरव क्लासेसतर्फे शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. या वेळी हिंदू जनजागृती समितीच्या कळंबोली केंद्राच्या वतीने शिवकालीन युद्धकलेची प्रात्यक्षिके दाखवली.

कार्यक्रमाचे वैशिष्टये म्हणजे कार्यक्रमाला सर्व मुली नववारी साड्या घालून आल्या होत्या. मुले केशरी कुर्ता व शिक्षिका पारंपरिक वेषभूषा करून आल्या होत्या. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पोवाडे, नृत्य व छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल भाषणे करण्यात आली. त्यावेळी विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसत होता.

समितीतर्फे क्रांतिकारकांचे फ्लेक्सचे प्रदर्शन लावण्यात आले, सनातन संस्थेच्या वतीने ग्रंथ प्रदर्शन लावण्यात आले होते.संतोष वर्तक यांनी उपस्थित विद्यार्थी आणि पालकांना स्वसंरक्षण आणि ग्रंथ वाचनाचे महत्व समजावून सांगितले.

सनातन संस्थेचे साधक अमोल दादांनी आजच्या काळात होणारे गैरप्रकार व त्यासाठी स्वतः सक्षम होणे ही काळाची गरज आहे हे समजावून सांगितले. या कार्यक्रमाला साधारण ४०० ते ४२५ विद्यार्थी व पालक उपस्थित होते. वैशिष्ट्य सरांनी पुढाकार घेऊन सनातन संस्थेकडे प्रात्यक्षिके दाखवण्याची मागणी केली होती. कार्यक्रम संपल्यावर बऱ्याच विद्यार्थ्यांची प्रशिक्षण शिकण्याची मागणी आली आहे.



# आदईच्या गार्डनमध्ये स्वच्छता मोहीम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तेजस्विनी सामाजिक व सांस्कृतिक फाऊंडेशन अलिबाग रायगड नवी मुंबई पनवेल शाखा तसेच पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आदई गार्डन न्यू पनवेल येथे शिवजयंती दिनाचे औचित्य साधून नुकतेच स्वच्छता अभियान झाले.

या वेळी कार्यक्रमासाठी पनवेल महापालिकेचे विशेष सहकार्य लाभले. आरोग्य विभाग परीक्षक शैलेश गायकवाड, अरुण कांबळे, अधिकारी सॅनिटरी इन्स्पेक्टर अभिजित भवर, स्वच्छता विभाग सुपरवायझर क्रांती चित्रे, स्वच्छता विभाग कर्मचारी अरुण शिंदे, रमेश बेत्ती, संतोष कांबळे आदी उपस्थित होते. या वेळी तेजस्विनी फाउंडेशन संचालिका तसेच नवी मुंबई शाखा प्रमुख राखी पाटील, तेजस्विनी फाउंडेशनच्या सदस्या व पनवेल तालुका उपविभाग प्रमुख जयश्री विजय खुटले, खजिनदार विजय गजानन पाटील आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शैलेश घरत, विवेक पाटील, सुनिता अदावले, दीपक लाडे, निर्झरा खुटले, विनोद मोरे, सह्याद्री प्रतिष्ठानचे प्रवीण ठाकूर, बळीराम पाटील, गंगाधर भायदे, काशिनाथ माने, वैशाली चंदनशिवे, वंदना निर्मल, वंदना येरुणकर, जयतून शेख आदींनी मेहनत घेतली. तेजस्विनी फाउंडेशनच्या अध्यक्ष जिविता पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# कळंबोलीत शिवजयंती साजरी

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली महिला मंडळ शहर सरचिटणीस दुर्गा सहानी यांच्या पुढाकाराने ओम साईनाथ सोसायटी बिल्डींग नंबर ४ येथे शिवजयंती मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात आली.

या वेळी दुर्गा सहानी, सुमेधा लीमन, देवता पाटील, सुजाता वडये, सुवर्णा कदम, मनीषा लंबाते, शीला देशमुख, शोभा शिंदे, सारिका कोळपे, मनीषा वाघचौरे, साधना कुवर, गौरी पवार, सुनिता पाटील, भारती इंगळे, निकिता मुळे, अश्विनी काळे, पूजा हासमाने रोशना पाटील, पूर्वा राणे, रुचिता पाटील, लता ठाकूर सुनैना पांडे आदी महिला उपस्थित होत्या.

या वेळी महिलांसाठी संगीत खुर्ची व इतर वेगवेगळे खेळ ठेवण्यात आले होते, अशी माहिती कळंबोली कार्यालयीन चिटणीस जगदीश खंडेलवाल यांनी दिली.





**उरण : भाजप चित्रपट युनियनचे अध्यक्ष संदीप घुगे यांनी चित्रपट युनियनच्या सचिव (महाराष्ट्र प्रदेश) कला समन्वयकपदी गौरी देशपांडे यांची नियुक्ती केली आहे. आमदार महेश बालदी यांनी देशपांडे यांना नियुक्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. यासोबतच कला क्षेत्रात स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी नवनवीन सांस्कृतिक उपक्रमास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.**

# वशेणी गावात घराला आग

**उरण : वार्ताहर**

वशेणी गावातील एका घराला रविवारी (दि. २०) भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या वेळी घरामध्ये कोणीही नसल्यामुळे सुदैवाने कोणतीही जिवीत हानी नाही झाली नाही. तरी आगीमुळे घरातील सामना जळून खाक झाले. आगीचे कारण अद्यापही समजू शकले नाही.

वशेणी गावातील समीर गावंड व कुंजवी गावंड यांच्या घरातील. सर्वजण रविवारी सायंकाळी लग्न समारंभासाठी गेले असताना त्यांच्या घराला आग लागली. घटनेची माहिती मिळताच अग्नीशमन दलाने आणि ग्रामस्थांनी आग आटोक्यात आणली. आगीत घरातील सामानाचे नुकसान झाले असून गावंड कुटूंबीयांना शासनाने मदत करावी, अशी मागणी ग्रामस्थ करत आहेत.



**पनवेल : महेश भोसले यांच्या नावडे फेज २मध्ये हेल्थ इन्साइड लॅबचे उद्घाटन भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दिनेश खानावकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी युवा मोर्चा फेज २ अध्यक्ष जितू काटकर, राजेश पाटील, शंकर वगरे, राजू सावंत आदी उपस्थित होते.**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ९

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. पुढीलपैकी कोणत्या कंपनीचा सेन्सेक्स ३० कंपन्यांत समावेश होत नाही?**
***अ.)*** सनफार्मा ***ब.)*** बजाज फायनान्स ***क.)*** एनटीपीसी ***ड.)*** बजाज ऑटो

**२. देशभर सेवा देणाऱ्या किती विमान कंपन्या सध्या भारतात आहेत?**
***अ.)*** १० ***ब.)*** ५ ***क.)*** ७ ***ड.)*** ३

**३. भारतातील सिमेंट क्षेत्रातील सर्वांत मोठी कंपनी कोणती?**
***अ.)*** अल्ट्राटेक सिमेंट ***ब.)*** अंबुजा सिमेंट ***क.)*** एसीसी ***ड.)*** श्री सिमेंट

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई–स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# एक सुडाचा प्रवास

आमचे हिंदुत्व म्हणजे सुडाचे राजकारण नव्हे अशी शेरेबाजी करत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हेच केंद्र सरकार आणि भारतीय जनता पक्ष विरोधकांशी सुडाचे राजकारण करत असून हा सुडाचा प्रवास थांबवायला हवा अशी अपेक्षाही त्यांनीच व्यक्त केली होती. तथापि, सुडाचे राजकारण नेमके कोण करते आहे हे महाराष्ट्राच्या जनतेला सोमवारी कळून चुकले असेल.

**सोमवारचा दिवस उजाडता उजाडताच मुंबई महापालिकेचे अधिकारी आणि पोलिसांचा फौजफाटा केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या जुहू येथील अधीश बंगल्यावर वाजतगाजत पोहचला. राणे यांच्या या बहुमजली इमारतीमध्ये अनधिकृत बांधकाम झाल्याची तक्रार आल्याचा पालिका अधिकाऱ्यांचा दावा आहे. त्याचवेळेला राणे यांच्या मालवणनजीक चिवला बीच येथील निलरत्न या बंगल्याच्या बांधकामातही किनारपट्टी संरक्षक कायद्याचे उल्लंघन झाल्याबद्दल नोटीस पाठवण्यात आली. याच्या एकच दिवस आधी राणे यांनी पत्रकार परिषद घेऊन महाविकास आघाडी सरकारचे अक्षरश: वाभाडे काढले होते. राणे यांचा तोफखाना धडाडल्यानंतर सत्ताधाऱ्यांना ताबडतोब जाग आली आणि त्यांनी राणे यांच्या दोन्ही बंगल्यांवर कारवाईच्या हालचाली सुरू केल्या. वर्षभरापूर्वी कंगना रणौत या अभिनेत्रीने महाविकास आघाडी सरकारविरोधात आवाज उठवला होता. त्यानंतर लगेचच तिच्या कार्यालयवजा बंगल्यावर बुलडोझर फिरवण्यात आला होता. मुंबई महापालिकेने आकसाने ही कारवाई केल्याचे निरीक्षण न्यायालयाने तेव्हाच नोंदवले होते. असली किरकोळ शुक्लकाष्ठे राणे यांच्या मागे लावून काहीही साध्य होणार नाही हे आधी सत्ताधाऱ्यांनी लक्षात घ्यायला हवे. महापालिकेमध्ये सध्या शिवसेनेची सत्ता आहे. या सत्तेचा वापर करण्यासाठी अगदीच कमी दिवस उरले आहेत. लवकरच महापालिकेवर प्रशासक येईल आणि शिवसेनेची राजवट संपेल. त्याआधी जमेल तितके राजकारण सत्ताधाऱ्यांना करून घ्यायचे आहे असे दिसते. जुहू येथील आपल्या बंगल्यामध्ये एक इंचदेखील अनधिकृत बांधकाम झालेले नाही, अशी ग्वाही खुद्द राणे यांनीच दिली आहे. उलट ठाकरे आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या मालकीच्या मातोश्री-२ या बंगल्यातील बेकायदा बांधकामे पैसे देऊन नियमित करून घेण्यात आली, असा आरोपही त्यांनी केला. या बंगल्याला परवाने कसे मिळाले त्याचीही माहिती आमच्याकडे आहे असे ते म्हणाले. मातोश्री-२ या बंगल्याचे बांधकाम गेल्या युती सरकारच्या काळातच झाले होते, तर राणे यांच्या अधीश बंगल्याचे बांधकाम बरीच वर्षे चालले होते. खुद्द माननीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनादेखील आपण नव्या घराबद्दल सांगितले होते व त्यांचे आशीर्वाद घेतले होते असे राणे यांनी सांगितले आहे. खुद्द बाळासाहेबांनी आशीर्वाद दिलेल्या बांधकामावरच त्यांच्याच संघटनेचे नेते हातोडा चालवत आहेत याला काळाचा महिमा म्हणावे की बदललेले राजकारण हे ज्याचे त्याने ठरवावे. एकंदरीत पाहता महाराष्ट्राचे राजकारण आता नेत्यांच्या घरापर्यंत पोहचू लागले आहे असे दिसते. भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते राजकारणामध्ये नेहमीच शुचिता पाळत आले आहेत. ती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शिकवणच आहे. गेल्या सव्वा दोन वर्षांमध्ये मात्र वैयक्तिक द्वेषापोटी गलिच्छ टीका करण्याचा प्रघात सत्ताधारी आघाडीतील नेते पाडत आहेत. हे गढुळलेले वातावरण पंतप्रधान मोदी किंवा भाजपने निर्माण केलेले नाही. किंबहुना सर्वाधिक निंदानालस्ती त्यांच्याच वाट्याला येते. हे सारे लवकरात लवकर थांबले पाहिजे, अन्यथा महाराष्ट्राची जनता योग्य वेळी आपल्या मतांच्या भाषेतून चांगलेच सुनावेल.**

# महापुरानंतर महाडमधील पहिला मजला रिकामा



२२ जुलै रोजी आलेल्या महापुरामध्ये महाड शहर आणि तालुक्यातील अनेक गावांचे अतोनात नुकसान झाले होते. शहरातील पुराच्या पाण्याची पातळी कधी नव्हे ती जवळपास २० फुटापर्यंत पोहोचली. यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान महाडकर नागरिकांना सहन करावे लागले होते. या महापुरानंतर महाड शहर पुन्हा उभे राहते की, नाही प्रश्न होता. मात्र मोठ्या धिटाईने महाडकर पुन्हा उभे राहिले. अन्य भागातून नोकरीनिमित्त आलेल्या लोक मात्र महाड सोडून जाण्याच्या मनस्थितीत आहेत. बहुतांश लोकांनी गाळे आणि पहिल्या मजल्यावरील सदनिका विक्रीस काढल्याचे ठिकठिकाणी लावलेल्या फलकांवरून दिसून येत आहे.



२२ जुलैच्या महापुराने संपूर्ण महाड शहर आणि तालुक्याची कंबरच मोडली. शहरातील पाण्याची पातळी २० फुटापर्यंत गेल्याने दुकानातील आणि घरातील सामान, साहित्य भिजून खराब झाले. या पुरात व्यापारी वर्गाचे अब्जो रुपयांचे

**खबरबात**
**महेश शिंदे**

नुकसान झाले. शहर पुन्हा कसे उभे राहील हा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. उद्ध्वस्त झालेले महाड शहर पुन्हा उभे राहणे सर्वांसमोर एक मोठे आव्हान होते. महाराष्ट्रातून आलेली मदत आणि लोकांचे हात, महाड पुन्हा उभे करण्यास महत्वाचे ठरले. महाड आता बऱ्यापैकी पूर्वपदावर आले आहे. यामुळे लोकांच्या मनातून पुराची भीती निघून गेली आहे, असे वाटत असले तरी पुन्हा असाच सामना करावा लागेल की, काय या भीतीतून मात्र महाडकर सावरलेले नाहीत. भाडेकरु सोडून गेल्याने इमारतीच्या इमारती ओस पडल्या आहेत.

येथील बाजार पेठेत पुन्हा नवीन नवीन उद्योग सुरू केले जात आहेत. त्यामध्ये खाद्य पदार्थाची दुकाने, हॉटेल, इलेक्ट्रॉनिक्सची दुकाने, कपड्यांची दुकाने मोठ्या प्रमाणात उघडण्यात येत आहेत. मात्र नोकरी, धंद्यानिमित्ताने आलेल्या अनेकांनी 'गड्या आपला गाव बरा' असे म्हणत, महाडमध्ये घेतलेल्या सदनिका विकून टाकण्यावर भर दिला आहे.

शहरातील बहुतांश भागात सध्या बांधकाम प्रकल्प सुरु आहेत. मात्र या इमारतीमधील सदनिकांना ग्राहक नसल्याने केवळ हातात घेतलेले काम पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे. महाडमध्ये जमीन घेताना फार विचार केला जात आहे. मात्र जागा विकत घेणारेदेखील याठिकाणी पाणी आले होते का, असा प्रश्न करूनच पुढील चर्चेला तयार होत आहेत. शहरात अशीच स्थिती पुढील काही वर्षात कायम राहिल्यास शहरातील आर्थिक गणिते ढासळण्यास वेळ लागणार नाही. सद्य स्थितीत पहिल्या मजल्यावरील सदनिका आणि पार्किंग जागेत बांधलेले गाळे अनेकांनी विक्रीस काढले आहेत. त्याचे फलक जागोजागी दिसून येत आहेत. हे गाळे परराज्यातून आलेले व्यवसायिक घेत असल्याचे चित्रदेखील पुढे येत आहे. बहुतांशी सदनिका या भाडे तत्वावर दिल्या आहेत. पुराच्या पाण्याच्या वेगाने सावित्री नदी किनारील इमारती धोकादायक ठरल्या आहेत. या इमारतींमध्ये राहण्यास मज्जाव केला जात आहे. तर काही इमारती या रि-डेव्हलप केल्या जाणार आहेत.

# उल्हास नदीतील गाळ काढा; निर्मल जल अभियान कार्यकर्त्यांची मागणी

**कर्जत : बातमीदार**

बारा महिने वाहणाऱ्या कर्जतमधील उल्हास नदीला कचरा, गाळ यामुळे विद्रुप स्वरूप आले आहे. नदीतील गाळ काढण्याची मागणी उल्हास नदी निर्मल जल अभियानाच्या कार्यकर्त्यांनी कर्जतचे तहसीलदार विक्रम देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गेल्या वर्षी उल्हास नदीला आलेल्या पुराचे पाणी कर्जत शहरात घुसले होते. त्यामुळे शहरातील कोतवाल नगर, मुद्रे, रेव्हेन्यू वसाहत, अभिनव ज्ञान मंदिर शाळेचा परिसर, आमराई, आणि इतर भागात राहणाऱ्या नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. तर अनेक जण बचावले होते.



(छाया : संतोष पेरणे)

श्रीराम पुल परिसरातील उल्हास नदीपात्राकडे पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष झाले आहे. यासाठी बऱ्याच वर्षांपासून साचलेला गाळ आणि जमा झालेला कचरा आणि तेथे वाढत असलेल्या झुडुपांनी धरून ठेवलेल्या मातीमुळे नदीपात्राची पातळी उथळ झाली आहे. नदीपात्रात ठिकठिकाणी झालेल्या बेकायदेशीर बांधकामांमुळे पुढील पावसाळ्यांमध्ये अशीच पूर परिस्थिती उद्भवण्याची शक्यता आहे. संभाव्य धोका टाळण्यासाठी नदीपात्रात असलेला गाळ, वाढलेली झुडूपे काढून नदीच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह पूर्ववत करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

उल्हास नदी निर्मल जल अभियानाचे कार्यकर्ते समित सोहनी यांनी हे निवेदन तहसीलदार विक्रम देशमुख यांना दिले.

> **उल्हास नदी निर्मल जल अभियान यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन मागील आठवड्यात शनी मंदिर येथे कर्जतमधील १५ नागरिकांनी नदीतील गाळ काढण्यासाठी श्रमदान केले.**
> **-विकास चित्ते, कार्यकर्ता, उल्हास नदी निर्मल जल अभियान**

# पैशाचा उपयोग जनसेवेसाठी केला पाहिजे -डॉ. तात्याराव लहाने



(छाया : संजय करडे)

**मुरूड : प्रतिनिधी**

जेव्हा आपण दुसऱ्यांच्या कामी येतो, तेव्हा त्यांचे आशीर्वाद आपणास मिळत असतात. पैशाचा उपयोग जनसेवेसाठी झाला तर लोकांचे आशीर्वाद मिळून आपला निश्चितच फायदा होतो, असे प्रतिपादन ख्यातनाम नेत्ररोगतज्ज्ञ पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनी मुरूड येथे केले.

पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनी मुरुड येथील संजवनी आरोग्य सेवा संस्थेस भेट दिली, यावेळी ते बोलत होते. विनाकारण गोळ्या, औषधे न खाण्याचा सल्ला त्यांनी या वेळी दिला.

विनाकारण गोळ्या खाऊ नका, त्याचा परिणाम किडनीवर होत असतो. दर महिन्याला दीड लाख लोक डायलेसिस करीत असतात. १२ टक्के लोकांना मधुमेह आहे. चालणे हा मधुमेहावर उत्तम उपाय आहे. प्रत्येकाने दिवसातून किमान पाच किलोमीटर तरी चालणे खूप आवश्यक आहे, असे डॉ. लहाने यांनी सांगितले.

संजवनी आरोग्य संस्थेस एक नवीन डायलेसिस मशीन देण्याचे यावेळी उद्योगजक व समाजसेवक डॉ. सनाउल्ला घरटकर यांनी जाहीर केले. संजवनी आरोग्य संस्थेच्या डायलेसिस सेंटरचे प्रमुख डॉ. मकबूल कोकाटे यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. तात्याराव लहाने यांच्या हस्ते डायलेसिस सेंटरमधील कर्मचाऱ्यांचा या वेळी सत्कार करण्यात आला.

संजवनी आरोग्य सेवा संस्थेचे कार्याध्यक्ष विजय सुर्वे, उपाध्यक्ष चंद्रकांत अपराध, सचिव अजित गुरव, खजिनदार कीर्ती शहा, संचालक जहूर कादरी, शशिकांत भगत, संचालिका वासंती उमरोटकर, नितीन आंबुर्ले, आदेश दांडेकर, रुग्णवाहिका कमिटीचे अध्यक्ष राशीद फहीम, माजी नगराध्यक्षा स्नेहा पाटील यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# मयूर शेळके शिव पुरस्काराने सन्मानित

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील चांधई ग्रामस्थ आणि हुतात्मा हिराजी पाटील तरुण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी लहान चांधई येथे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यावेळी शूरवीर मयूर शेळके यांना शिव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

इतिहास संशोधक शिवश्री वसंत कोळंबे यांच्या मार्गदर्शनाखाली लहान चांधई येथे गेल्या १६ वर्षापासून शिवजयंती साजरी करण्यात येत आहे. मध्य रेल्वेच्या वांगणी स्टेशन येथे एका अंधमातेच्या मुलाला ट्रेन खाली येत असताना कर्तव्यावर असलेले मयूर शेळके यांनी मोठ्या धाडसाने वाचविले होते. त्यांना चांधई येथील शिवजयंती सोहळ्यात शिव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. धनंजय थोरवे, नेहा राजेंद्र आढाव, श्रावणी जाधव, सोनाली कोंडिलकर तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा या वेळी सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. पत्रकार बाळा गुरव यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. प्रा. विजय कोंडिलकर यांचे यावेळी व्याख्यान झाले.

जि.प. सदस्या सहारा कोळंबे, नसरापूर सरपंच साक्षी मोहिते, माजी सरपंच राम कोळंबे, चांधई गावचे पोलीस पाटील सचिन कोळंबे, पळस्पे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच मोहन गवंडी, तसेच जयेंद्र कराळे, विनायक पारधी, संतोष ऐनकर, भगवान धुळे, आकाश निर्मळ यांच्यासह ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.



## आरोग्य प्रहर

# झोपेतून जागे होताच मोबाइल वापरणे आरोग्यासाठी घातक

मोबाइल, स्मार्टफोनचा वापर दिवसेंदिवस एवढा वाढलेला आहे की जर आपल्याकडे काही वेळ स्मार्टफोन नसला तरी आपल्याला चुकल्यासारखे वाटते. हल्ली स्मार्टफोनचा वापर एक सवय नाही तर व्यसन बनले आहे. अनेकजण असे सुद्धा आहेत की, जे रात्री झोपताना आपल्याजवळ स्मार्टफोन घेऊन झोपतात आणि सकाळी उठल्यावर झोपेतून पहिल्यांदा मोबाइल चेक करतात, अशा लोकांची सुद्धा संख्या कमी नाहीये. तसे पाहायला गेले तर स्मार्ट फोन व मोबाईल वर जास्त प्रमाणात अवलंबून राहणे हे आपल्यासाठी चांगले नाही. जर तुम्हाला सुद्धा सकाळी झोपेतून जागे झाल्यावर मोबाइल वापरण्याची सवय असेल तर ही सवय भविष्यात घातक ठरू शकते.

**ताण तणाव आणि चिंता :** झोपेतून जागे झाल्यावर जर आपण सोशल मीडिया चेक करतो तेव्हा आपला मेंदू सोशल मीडियावरील वेगवेगळ्या माहितीमुळे व्यस्त होऊन जातो. अशातच आपल्या दिवसाची सुरुवात तनाव आणि चिंता ग्रस्त दर्शविणाऱ्या बातम्या किंवा घटनाद्वारे होते. अशा प्रकारची चिंता व ताणतणाव आपल्या आरोग्यासाठी घातक ठरू शकते.

**कॅन्सर आणि दृष्टी खराब होण्याची शक्यता :** एका संशोधनामध्ये असे सिद्ध झाले आहे की, आपण सकाळी झोपेतून जागे झाल्यावर मोबाइलचा वापर केल्यास आपल्या डोळ्यांवर त्याचा विपरीत परिणाम पाहायला मिळतो. मोबाईल मधील लाईट थेट डोळ्यांवर आल्यामुळे तुम्हाला डोळ्यांच्या किंवा डोकेदुखीच्या समस्या भविष्यात उद्भवू शकतील. यामुळे तुमची एकाग्रता व लक्ष केंद्रित करण्याची क्षमता कमकुवत होऊ शकते सोबतच जर आपण स्मार्ट फोन जास्त वेळ वापर केला तर आपल्याला मान दुखी, वेदना, अति लठ्ठपणाची समस्या, कॅन्सर, इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशन, अनिद्रा आणि मेंदू मध्ये होणारे वेगवेगळे बदल यासारख्या समस्या भविष्यात होण्याची शक्यता वर्तवण्यात आलेली आहे.

**चिडचिडेपणा वाढू शकतो :** सकाळी झोपेतून जागे झाल्यावर जर आपण मोबाईल वापरला तर अशावेळी चिडचिडपणा येऊ शकतो. सकाळी उठल्यावर तुम्ही मोबाइल मध्ये अशी एखादी घटना किंवा गोष्ट पाहिली ज्यामुळे तुमच्या दिवसाची सुरुवात नकारात्मकतेने होईल, अशा प्रकारचे दृष्य व घटना पाहिल्यामुळे तुमचा दिवस सुद्धा संपूर्ण नकारात्मक जाण्याची शक्यता असते. नकारात्मक दृष्टिकोन मुळे तुमची चिडचिड होण्याची शक्यता जास्त असते.

**डिप्रेशन येण्याची भीती :** रात्री झोपताना आणि सकाळी उठल्यावर मोबाइल वापरणाऱ्यांना भविष्यात डिप्रेशनची समस्या उद्भवू शकते, असे संशोधन केल्यावर सिद्ध झाले आहे. नियमितपणे आपण दिवसभरातून जास्त वेळ मोबाइल वापरला तर त्याचा विपरीत परिणाम आपल्या मानसिक स्थितीवर होतो.

# रोह्यात ८५ जणांचे रक्तदान



(छाया : महादेव सरसंबे)

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा-मुरुड क्षत्रिय मराठा समाज आणि वर्ल्ड मराठा ऑर्गनायझेशन यांच्या संयुक्त वतीने येथील भाटे सार्वजनिक वाचनालयात रविवारी (दि. २०) रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ८५ जणांनी रक्तदान केले.

क्षत्रिय मराठा समाज अध्यक्ष काशीनाथ सावंत, सेक्रेटरी संदिप सावंत, सकल मराठा समाज तालुकाध्यक्ष अप्पा देशमुख, मराठा समाज अध्यक्ष अमित उकडे, मराठा महासंघ तालुका अध्यक्ष लिलाधर देशमुख, वर्ल्ड मराठा ऑर्गनायझेशनचे प्रतिनिधी रोहीत उतेकर, अनिकेत पार्टे, किशोर तावडे, सचिन देवकर, निलेश शिर्के आदीं या वेळी उपस्थित होते. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी क्षत्रिय मराठा समाज, वर्ल्ड मराठा ऑर्गनायझेशन व मराठा समाज बांधवांनी परिश्रम घेतले.

# शिक्षक पतपेढीत आरटीजीएस, एनईएफटी सुविधा

**अलिबाग : प्रतिनिधी**

शिवजयंतीचे औचित्य साधत रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या अलिबाग येथील मुख्यालयात शनिवारी आरटीजीएस आणि एनईएफटी सुविधा सुरू करण्यात आल्या. याचा लाभ पतसंस्थेच्या सभासद ग्राहकांना होणार असून व्यवहार करणे अधिक सुलभ होणार आहे.

एखाद्या सभासदाचा मुलगा, मुलगी शिक्षणासाठी परदेशी अथवा इतर ठिकाणी असेल किंवा सभासद व त्याचा नातेवाईक कोणत्याही शहरामध्ये वैद्यकीय उपचार घेत असेल तर तातडीने सभासदाच्या खात्यावर रक्कम जमा होणार आहे. त्यामुळे अनेक समस्या सुटण्यास मदत होईल. संस्थेच्या आरटीजीएस व एनईएफटीद्वारे खात्यामध्ये पैसे जमा करणे सभासदांना सोयीचे होणार आहे. सभासदांना घरबसल्या व्यवहार करता येणार आहेत. नजीकच्या काळात संस्थेच्या माध्यमातून प्रत्येक सभासदांचे बचत खाते उघडण्यात येणार आहे. याचा लाभ जिल्ह्यातील व कोकण विभागातील सभासदांना होणार आहे. शिक्षक पतपेढी भविष्यात अग्रगण्य पतसंस्था म्हणून नावलौकीक मिळवेल, असा विश्वास चेअरमन राजेश सुर्वे यांनी या वेळी व्यक्त केला.

पॅनल प्रमुख नरेंद्र गुरव, संस्थेचे व्हाइस चेअरमन देवानंद गोगर, मानद सचिव विलास पाटील, जितेंद्र बोडके, उमेश महाडेश्वर, वैभव पिंगळे, दीपक साळवी, बालाजी गुबनरे, अमोल केतकर, लिना पाटील, महेंद्र सातमकर यांच्यासह संस्थेचे कर्मचारी या वेळी उपस्थित होते.



# पत्रकारांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

## आरोपीला अटक ▌ पोलीस अधीक्षकांच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे

**अलिबाग : प्रतिनिधी**

नेरळ येथील पत्रकार अजय गायकवाड यांच्यावर हल्ला करणाऱ्याला तात्काळ अटक करावी, या मागणीसाठी रायगड प्रेस क्लबच्या वतीने सोमवारी (दि. २१) अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षणिक उपोषण करण्यात आले.

पत्रकारांच्या शिष्टमंडळाने रायगडचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांची भेट घेतली. आरोपीला ताब्यात घेतले आहे, त्याला न्यायालयात हजर केले जाईल. न्यायालयाच्या आदेशानुसार आरोपीवर कारवाई केली जाईल. असे आश्वासन अशोक दुधे यांनी दिले. त्यानंतर पत्रकारांनी उपोषण मागे घेतले.




बातमी देण्याच्या रागातून नेरळ वाल्मिकीनगर येथील तरुणाने १५ फेब्रुवारी रोजी पत्रकार अजय गायकवाड (रा. नेरळ) यांना मारहाण केली होती. या गुन्ह्याची नोंद नेरळ पोलीस ठाण्यात त्यादिवशी करण्यात आली होती, मात्र आरोपीला अटक झाली नव्हती. पोलिसांनी आरोपीला तत्काळ अटक करावी, या मागणीसाठी रायगड प्रेस क्लबच्या वतीने अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हे लक्षणिक उपोषण करण्यात आले होते.

रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष भारत रांजणकर, उपाध्यक्ष मोहन जाधव, कार्याध्यक्ष मनोज खांबे, माजी अध्यक्ष विजय मोकल, अनिल भोळे, संतोष पेरणे, अभय आपटे, दर्वेश पालकर, अजय गायकवाड, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर, ज्येष्ठ छायाचित्रकार वामन पाटील आदी या आंदोलनात सहभागी झाले होते.

> **नेरळमधील पत्रकार अजय गायकवाड यांच्यावर १५ फेब्रुवारी रोजी हल्ला करण्याऱ्या आरोपीला ताब्यात घेतले आहे, कर्जत न्यायालयाच्या आदेशानुसार आरोपीवर कारवाई केली जाईल.**
> **–अशोक दुधे**
> **पोलीस अधीक्षक, रायगड**

## पाली फाटा येथे गोदामाला भीषण आग

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**



खोपोली–पेण मार्गावरील पाली फाटा येथील प्लास्टिक साठवण गोदामाला रविवारी (दि. २०) रात्री ११ वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली. खोपोली आणि औद्योगिक वसाहतीमधील अग्निशमन दलांच्या जवानांनी पाच बंबांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवले. हे गोदाम पालीफाटा येथील अरिहंत अर्शियाच्या समोर आहे. या आगीचे कारण समजू शकले नाही.

## जाहीर नोटीस

माझ्या अशिलांच्या वतीने सर्व जनतेस या नोटीसीद्वारे असे सुचित करण्यात येते कि, खालील भुखंडाचे मालक **श्री. जगदीश मधुकर पाटील**, रा. बामनडोंगरी, खालची आळी, पो.वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या मालकीचा सिडकोकडून २२.५% योजनेनुसार प्रस्तावित नवी मुंबई अंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी संपादीत करण्यात आलेल्या जमिनीबदल व बांधकामाबद्दल नुकसान भरपाईपोटी मिळालेला **भुखंड क्र.४९, सेक्टर–२६, क्षेत्र २९०.०० चौ.मी. नोड–पुष्पक (वहाळ), ता. पनवेल, जि. रायगड.** त्यांच्या ताबेकब्जात आहे. सदर भुखंडाच्या एकुण क्षेत्रफळ २९० चौ.मी.पैकी ५०% क्षेत्रफळ **(क्षेत्र १४५.०० चौ.मी.)** ते माझे अशिल **मे. ऑर्किड एन्टरप्राईजेस तर्फे प्रोप्रा. श्री. उमंग मनसुखलाल गजेरा, पत्ता – ५०८, साईधाम को. ऑप. हौ.सो.ली., प्लॉट नं.४०. सेक्टर–१७, वाशी, नवी मुंबई** यांच्या नावे ''**त्रिपक्षिय करारनाम्याद्वारे**'' कायमस्वरूपी हस्तांतरण करीत आहेत.

| नोड | सेक्टर | भुखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पक (वहाळ) | २६ | ४९ | २९०.०० चौ.मी.<br>पैकी ५० टक्के हिस्सा<br>१४५.०० चौ.मी. |

तरी कोणीही व्यक्ती/ व्यक्तीचे किंवा अर्थिक संस्थांचे सदर भुखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती, जसे विक्री, बोजा, दान, गहाण, सरकारी निमसरकारी, कंपनी बक्षीस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत या भुखंडाच्या संबंधित कागद पत्रासोबत माझ्या कार्यालयिन पत्यावर संपर्क साधावा. अन्यथा सदर भुखंडाच्या त्रिपक्षिय करारनाम्याद्वारे हस्तांतरण करण्याची प्रक्रीया पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती/तक्रारीचा विचार करण्यात येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

दिनांक : २१/०२/२०२२

**सही/–**
**ॲड. निरंत वासुदेव पाटील**

**कार्यालय –** तळ मजला, प्लॉट नं. बी–४०, से.२०, अष्टविनायक बिल्डींग, नेरूळ गाव, नवी मुंबई–४००७०६ . मो. ९३२४५६९८०६

# ममदापूर गावात सिलिंडरचा स्फोट

**कर्जत : बातमीदार**

नेरळ जवळील ममदापूर गावातील वरच्या आळीमधील एका घरात रविवारी (दि. २०) सायंकाळी गॅस सिलिंडरचा स्फोट झाला. त्यात संपूर्ण घराचे नुकसान झाले. सुदैवाने घरात असलेल्या सीताबाई रामा डांगरे या आजी थोडक्यात बचावल्या.



(छाया : संतोष पेरणे)

ममदापूर गावात सीताबाई रामा डांगरे यांचे घर आहे. रविवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास सीताबाई जेवण बनवत असताना गॅस सिलेंडरचा स्फोट झाला. त्या नंतर कौलारू घराला आग लागली. ग्रामस्थांनी सीताबाई यांचे पुत्र राजेंद्र यांच्या घराच्या आवारातील बोअरवेलचे पाणी मारून आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र त्या घरात लाकडांचे सिलिंग केले असल्याने आग भडकली. त्यात घराचे ९०टक्के नुकसान झाले. काही तरुणांनी थेट घरावर चढून पाण्याचा मारा सुरू ठेवला होता. या प्रयत्नात राजेंद्र डांगरे जखमी झाले तर काही तरुण खाली जमिनीवर कोसळले. त्यांना किरकोळ मार लागला आहे.

या घटनेची माहिती मिळताच नेरळ पोलीस घटनास्थळी पोहचले. त्यांनी कर्जत येथील अग्निशमन केंद्राला खबर दिली, मात्र ही अग्निशमन यंत्रणा ममदापूर गावात रात्र साडे आठ वाजता पोचली. तासाभराने आग विझविण्यात यश आले. दरम्यान, नेरळ येथील भारत गॅसचे पथक घटनास्थळी पोहचले.

## खोपोलीत अपघातामध्ये दुचाकीस्वार ठार

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील हायको कॉर्नरजवळ सोमवारी (दि. २१) पहाटेच्या सुमारास झालेल्या अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार झाला.

सिद्धार्थ विनायक दळवी (वय २७, रा. पेण) हा युवक दुचाकीवरुन खोपोली मोगलवाडीमध्ये कामानिमित्त येत होता. सोमवारी पहाटेच्या सुमारास खोपोलीतील हायको कॉर्नरजवळच्या वळणावर त्याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने स्वागत कमानीला धडकून तो गटारात कोसळला. या अपघातात सिद्धार्थ दळवी याच्या डोक्याला गंभीर जखम होऊन अतिरक्तस्त्राव झाला. त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला.


PSA MUMBAI

Bharat Mumbai Container Terminals (BMCT), is located in Jawaharlal Nehru Port in Maharashtra. India's largest and premier container gateway. BMCT started operations in 2018 and by the end of 2025, will be India's largest container terminal with an ultimate capacity of 4.8m TEU.
BMCT seeks qualified persons for the below-mentioned position.
First preference shall be given to JNPT Project Affected Persons (PAP) to the extent qualified PAPs are available and willing to join, subject to PAP verification by JNPT.

**Container Equipment Specialist (CES) Quay Crane Operator**

This position holder will be responsible to operate various types of container handling equipment in accordance with the company's safe handling policy. Candidate should have an Engineering degree/diploma OR any graduate from a reputed university having a Minimum of 5-7 Years' Experience in container Terminal handling with a volume capacity of 1 million TEUs per annum. Should have Operating License / Certificate for QC and have minimum 2 years' Operating experience on QC.
**Age Limit – Up to 35 years**

**Jr. Technical Specialist – Mechanical**

The candidate should be an Engineering Graduate or Diploma in Mechanical Engineering from a Technical University. The candidate must have a minimum of 02 Yrs. Of relevant experience in a port or any heavy equipment maintenance Industry. The candidate must be well versed in maintaining, troubleshooting, and repairing the mechanical system used for container terminal operations and able to read and interpret drawings and hydraulics circuits. The candidates should be willing to work hands-on on equipment. He should participate in equipment modification projects to improve reliability and maintainability.

**Age Limit – Up to 30 years**

**Jr. Technical Specialist – Electrical**

The candidate should be an Engineering Graduate or Diploma in Electrical / Electronic Engineering from a Technical University. The candidate must have a minimum of 02 Yrs. Of relevant experience. Candidate must be well versed in maintaining, troubleshooting, and repairing the Electrical & Electronics systems of the container terminals, with hands-on experience for troubleshooting PLC, AC Drives, and LV/HV systems. He should participate in equipment modification projects to improve reliability and maintainability.

**Age Limit – Up to 30 years**

**IT Executive/Senior Executive (Network)**

This position is responsible for IT Network Administration and operations. The candidate should have in-depth knowledge on the usage and troubleshooting of Microsoft-based operating systems and productivity suites along with in-depth knowledge of Network Switch administration, Firewall configuration, and maintaining Policies. Must have CCNA, CCNP certification, or equivalent with at least 4 years of relevant experience.

**Age Limit – Up to 30years**

**IT Assistant Manager (Network)**

This position is majorly responsible for Network administration, Implementing and maintaining IT security policies, Managing Network Switches, Firewall, and Hardening of all Network Devices, Firmware up-gradation of all Network Devices, Troubleshoot and resolving Network issues, maintaining all IT assets. The candidate should have a degree in Computer Science along with at least 9 years of relevant experience in the area of network administration and network domains.
**Age Limit – Up to 35 years**

**Application Process**

Interested candidates should visit our recruitment portal **www.bmctpl.com** and peruse the job requirements for each position; thereafter register and follow the instructions detailed there to apply for the relevant position **and /or** send your application to resume@bmctpl.com

The applications must be received online before **01st March2022**. Only shortlisted candidates will be contacted.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | करारनामा/ वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा/भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार करारनामा/ वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नोड - करंजाडे | | | | |
| १ | ११६ | करंजाडे ७० | ८८/१ई | ०-४३-५ | ४६०० चौ.मी. पैकी ३८५० चौ.मी. | मौजे करंजाडे, भूखंड क्र. ०१, सेक्टर-२A, क्षेत्र-३८४९.६८ चौ.मी. | मा. न्यायालयिन वारसदाखला क्र. १९३/१९९५ व ४९/१९९७ नुसार -<br>कै. तुकाराम जोमा म्हात्रे व<br>कै. भागीरथी तुकाराम म्हात्रे यांचे वारस -<br>श्रीमती हिराबाई नारायण म्हात्रे | मा. दिवाणी न्यायालय वाशी आ. सी. क्र. ८०९/२०१४ व गु. रं. नं. ८३/२०१३ या दाव्यामध्ये दिलेल्या निकालानुसार |
| | | करंजाडे III/ KRJD/SR-१२/३ | १००/१ | ०-२२-५ | | | | |
| | | करंजाडे १८ नविन | १०४A/१ | ०-०२-८ | | | | |
| | | करंजाडे ८१ (न्यु) | १०१/ ३+५A | १-२०-४ | | | | |
| | | करंजाडे ५२ (न्यु) | १०१/२ | १-२४-४ | | | | |
| | | करंजाडे ११४ (न्यु) | ११९/१<br>१०४A/३<br>११८/१ | ०-१९-१<br>०-२५-०<br>०-८२-२ | | | | |
| | | करंजाडे ११२/११४ | ११७/० | ०-५७-० | | | | |
| | | करंजाडे ७३/४२ | ४/३ | ०-३०-१ | | | | |
| | | | **एकुण संपादित क्षेत्र** | **५-२७-०** | | | | |
| | | | | ता. पनवेल, जि. रायगड | | | | |
| २ | तळोजा १०८२ | पेंधर १/२००८ | २५०/२<br>२६४/७ | ०-२२-०<br>०-२९-० | ४५० चौ.मी. | भूखंड क्र. १२H, सेक्टर-२४, क्षेत्र-४४९.६२ चौ.मी. | **कै. सावित्रीबाई आत्माराम कदम (मयत) यांचे वारस**<br>श्रीमती जयश्री दगडु दळवी | निरंक |
| ३ | तळोजा १००० | पडघे १७B | १६/२ | ०-१८-० | १५० चौ.मी. | भूखंड क्र. १४४, सेक्टर-२, क्षेत्र-१४९.८७ चौ.मी. | **कै. शांताराम आंबो भोईर (मयत) व कै. देवकीबाई शांताराम भोईर (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. त्रिबंक शांताराम भोईर<br>२) श्रीमती गोदाबाई माया जोशी<br>३) श्रीमती मुक्ताबाई हिरामण उर्फ घंटुराम पाटील | निरंक |
| ४ | उलवे १७५ | गव्हाण ७६४ | २१५/१२<br>२१५/७<br>२१५/११ | ०-०९-१<br>०-४८-४<br>०-११-६ | एकूण मंजूर पात्रता ६०० चौ.मी. पैकी ३०० चौ.मी. प्रस्तावित | भूखंड क्र. बी-५३, सेक्टर-०८, क्षेत्र-३०० चौ.मी. | **श्री. वसंत हरी पाटील** | रे.मु.क्र. १४३/२००५ हा दावा प्रस्तावित मिळकतीचे अनुषंगाने ठरावा करता व सरस निरस वाटपकरीता दाखल केला होता. सदर दावा दि. २६.०१.२००६ रोजी निकाली झाल्याचे दिसून येते. सदर दावा मिळकतीचे मोबदल्यात १२.५ टक्के योजनेतील भूखंड व वाढीव नुकसान भरपाईचे रकमेत वादीस अर्धा हिस्सा देण्यास प्रतिवादी तयार आहेत असे नमूद केले आहे. |
| | | | **एकुण** | **०-६९-१** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र.१०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

CIN - U99999 MH 1970 SGC-014574

www.cidco.maharashtra.gov.in

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
सिडको/जनसंपर्क/४३४/२०२१-२२

# टीम इंडियाचे निर्भेळ यश

## टी-२० मालिकेतही विंडीजला क्लिन स्वीप




**कोलकाता : वृत्तसंस्था**

सूर्यकुमार यादवने साकारलेल्या अर्धशतकामुळे (३१ चेंडूंत ६५ धावा) भारताने रविवारी तिसऱ्या ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यात वेस्ट इंडिजवर १७ धावांनी सरशी साधली. या विजयासह भारताने या मालिकेवर ३-० असे वर्चस्व गाजवले. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली हा भारताचा निर्भेळ यशासह सलग तिसरा मालिकाविजय ठरला.

कोलकाता येथील ईडन गार्डन्स मैदानावर झालेल्या अखेरच्या ट्वेन्टी-२० सामन्यात भारताने दिलेल्या १८५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना विंडीजला २० षटकांत ९ बाद १६७ धावाच करता आल्या. रोहितच्या नेतृत्वाखालील भारताने मागील वर्षीच्या अखेरीस घरच्या मैदानावरील ट्वेन्टी-२० मालिकेत न्यूझीलंडला ३-० अशी धूळ चारली. त्यानंतर भारत दौऱ्यावर आलेल्या विंडीजविरुद्धच्या एकदिवसीय आणि ट्वेन्टी-२० मालिकांमध्ये निर्भेळ यश संपादले. सूर्यकुमारने सामनावीर आणि मालिकावीर पुरस्काराचा बहुमान पटकावला.

तिसऱ्या सामन्यात विंडीजने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचे आमंत्रण दिल्यावर भारताने २० षटकांत ५ बाद १८४ अशी धावसंख्या उभारली. या सामन्यात महाराष्ट्राच्या ऋतुराज गायकवाडला सलामीला संधी मिळाली, मात्र केवळ चार धावा करून तो जेसन होल्डरच्या गोलंदाजीवर बाद झाला. यानंतर इशान किशन (३४) आणि श्रेयस अय्यर (२५) यांनी ५३ धावांची भागीदारी रचली. या दोघांसह चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेला कर्णधार रोहित (७) काही धावांच्या अंतराने माघारी परतल्याने भारताची १३.५ षटकांत ४ बाद ९३ अशी स्थिती झाली. मग सूर्यकुमार आणि वेंकटेश अय्यर यांनी षटकार-चौकारांची आतषबाजी करीत सहा षटकांतच ९१ धावांची भागीदारी रचली. सूर्यकुमारने आंतरराष्ट्रीय ट्वेन्टी-२० क्रिकेटमधील चौथे अर्धशतक झळकावताना ३१ चेंडूंत एक चौकार आणि तब्बल सात षटकारांच्या साहाय्याने ६५ धावांची खेळी केली. त्याला वेंकटेशने १९ चेंडूंत चार चौकार आणि दोन षटकारांसह नाबाद ३५ धावा करत तोलामोलाची साथ दिली.

१८५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना विंडीजच्या डावाची अडखळती सुरुवात झाली. एका बाजूने फलंदाज बाद होत असताना दुसऱ्या बाजूने डावखुऱ्या निकोलस पूरनने अप्रतिम फलंदाजी केली. त्याने ४७ चेंडूंत ६१ धावांची खेळी करताना या मालिकेतील सलग तिसरे अर्धशतक साकारले, मात्र त्याला रोमारियो शेफर्ड (२९) आणि रोव्हमन पॉवेल (२५) यांचा अपवाद वगळता त्याला इतरांची फारशी साथ लाभली नाही. त्यामुळे विंडीजला २० षटकांत ९ बाद १६७ धावाच करता आल्या. ट्वेन्टी-२० प्रकारात विंडीजचा हा ८३वा पराभव आहे.

**संक्षिप्त धावफलक**

भारत : २० षटकांत ५ बाद १८४ (सूर्यकुमार यादव ६५, वेंकटेश अय्यर नाबाद ३५; रॉस्टन चेस १/२३) विजयी वि. वेस्ट इंडिज : २० षटकांत ९ बाद १६७ (निकोलस पूरन ६१, रोमारियो शेफर्ड २९; हर्षल पटेल ३/२२, दीपक चहर २/१५).

### रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा

# महाराष्ट्राची विजयी सलामी



**रोहतक : वृत्तसंस्था**

डावखुरा फिरकीपटू सत्यजीत बच्छावच्या (७/४५) उत्कृष्ट गोलंदाजीच्या जोरावर महाराष्ट्राने ग-गटातील लढतीत आसामवर एक डाव आणि सात धावांनी वर्चस्व गाजवून रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत विजयी सलामी दिली. त्यामुळे महाराष्ट्राला सात गुण मिळाले.

रोहतक येथे झालेल्या या सामन्यात पदार्पणवीर पवन शहाच्या (२१९) द्विशतकाच्या बळावर महाराष्ट्राने पहिल्या डावात ४१५ धावांची मजल मारली होती. प्रत्युत्तरात आसामचा संघ २४८ धावांत गारद झाल्याने महाराष्ट्राला पहिल्या डावात १६७ धावांची आघाडी मिळाली. त्यानंतर महाराष्ट्राचा कर्णधार अंकित बावणेने आसामला फॉलोऑन देण्याचा निर्णय घेतला. अखेरच्या दिवशी आसामचा दुसरा डाव १६० धावांत संपुष्टात आल्याने महाराष्ट्राने विजयाची नोंद केली. पहिल्या डावात चार बळी मिळवणाऱ्या बच्छावने दुसऱ्या डावातही प्रभावी मारा करताना ४५ धावांच्या मोबदल्यात सात गडी बाद केले.

आसामने चौथ्या दिवशी दुसऱ्या डावात ३ बाद ८२ अशा धावसंख्येवरून पुढे खेळण्यास सुरुवात केली. रियान पराग (५६) आणि स्वरूपम पुर्कायास्था (३८) यांनी चौथ्या गड्यासाठी ७२ धावांची भागीदारी रचत आसामचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र, मनोज इंगळेने परागला बाद करत ही जोडी फोडली. यानंतर बच्छावने १६ धावांच्या अंतराने सहाही बळी घेत आसामचा डाव १६० धावांवर संपुष्टात आणला.

**संक्षिप्त धावफलक**

महाराष्ट्र (पहिला डाव) : ४१५, आसाम (पहिला डाव) : २४८, आसाम (दुसरा डाव) : ७३ षटकांत सर्वबाद १६० (रियान पराग ५६, स्वरूपम पुर्कायास्था ३८; सत्यजीत बच्छाव ७/४५, मनोज इंगळे २/२९), सामनावीर : पवन शहा.

## पुजारा, पटेल यांनी मुंबईचा विजय हिरावला



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

भारताच्या कसोटी संघातील स्थान गमावणाऱ्या चेतेश्वर पुजाराने (८३ चेंडूंत ९१ धावा) आक्रमक शैलीत खेळ करून सौराष्ट्राचा पराभव टाळला. पुजारा आणि स्नेल पटेल (१५५ चेंडूंत ९८) यांच्या अर्धशतकांच्या बळावर सौराष्ट्रने रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या ड-गटात मुंबईविरुद्धचा साखळी सामना अनिर्णित राखण्यात यश मिळवले.

अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या या सामन्यातील अखेरच्या दिवशी सौराष्ट्रने दुसऱ्या डावात ९ बाद ३७२ धावांपर्यंत मजल मारली. पहिल्या डावात फॉलोऑन पत्करूनसुद्धा सौराष्ट्रने दुसऱ्या डावात ४८ धावांची आघाडी घेतली. अखेर दिवसातील षटके संपल्याने पंचांनी सामना अनिर्णित झाल्याचे घोषित केले. मुंबईकडून फिरकीपटू शाम्स मुलानीने तब्बल सात बळी मिळवून सौराष्ट्रला झटपट गुंडाळण्यासाठी अथक प्रयत्न केले. मुंबईला पहिल्या डावातील आघाडीचे तीन गुण मिळाले, तर सौराष्ट्रने एक गुण मिळवला.

**संक्षिप्त धावफलक**

मुंबई (पहिला डाव) : ७ बाद ५४४ (डाव घोषित), सौराष्ट्र (पहिला डाव) : २२०, सौराष्ट्र (दुसरा डाव) : ११६ षटकांत ९ बाद ३७२ (स्नेल पटेल ९८, चेतेश्वर पुजारा ९१; शाम्स मुलानी ७/११४), सामनावीर : सर्फराज खान.

### बुद्धिबळाच्या पटावर मोठा उलटफेर

# भारताच्या प्रज्ञानंदने बलाढ्य कार्लसनला हरवले





**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा १६ वर्षीय ग्रँडमास्टर आर प्रज्ञानंदने ऑनलाइन खेळल्या गेलेल्या जलद बुद्धिबळ स्पर्धा एअरथिंग्स मास्टर्समध्ये मोठा उलटफेर केला आहे. त्याने जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकाचा बुद्धिबळपटू मॅग्नस कार्लसनचा सामन्यात एकतर्फी पराभव केला.

या सामन्यात प्रज्ञानंदने काळ्या मोहऱ्यांसह खेळण्यास सुरुवात केली आणि कार्लसनचा ३९ चालींमध्ये पराभव केला. या विजयानंतर प्रज्ञानंद १२व्या क्रमांकावर पोहचला असून त्याचे आठ गुण झाले आहेत. यापूर्वी त्याने फक्त लेव्ह अरोनियनविरुद्ध विजय नोंदवला होता. याशिवाय त्याने दोन सामने अनिर्णित खेळले, तर चार सामन्यांमध्ये त्याला पराभवाचा सामना करावा लागला.

काही महिन्यांपूर्वी नॉर्वेच्या कार्लसनकडून वर्ल्ड चॅम्पियनशिपच्या सामन्यात पराभूत झालेला रशियाचा इयान नेपोम्नियाची १९ गुणांसह अव्वल स्थानावर आहे. त्यांच्यानंतर डिंग लिरेन आणि हॅन्सन या दोघांकडे १५ गुण आहेत. एअरथिंग्स मास्टर्समध्ये १६ खेळाडू सहभागी झाले आहेत. यामध्ये खेळाडूला विजयासाठी तीन गुण आणि ड्रॉसाठी एक गुण मिळतो.







**पनवेल : भारतीय जनता पक्ष खांदा कॉलनी आणि ओम साई खांदेश्वर महिला व बाल मित्र मंडळाच्या वतीने खांदा कॉलनीत खांदेश्वर कोकण महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. सेक्टर ८ येथील पोलीस ठाण्यासमोरील मैदानावर आयोजित या महोत्सवाला रविवारी महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर आणि पंचायत समिती सदस्य तथा भाजप महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. आयोजक उपमहापौर सीताताई पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, महिला मोर्चाच्या लीना पाटील, प्रतिभा भोईर, प्रणाली घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.**

# सूर्यकुमारने भर मैदानातूनच केला सहकाऱ्यांना प्रणाम



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईकर सूर्यकुमार यादवने कलात्मक आणि आगळ्यावेगळ्या फटक्यांसह साकारलेल्या अर्धशतकाच्या जोरावर भारताने तिसऱ्या टी-२० क्रिकेट सामन्यात वेस्ट इंडिजवर मात केली. या शेवटच्या सामन्यामध्ये चर्चेचा विषय ठरला तो सूर्यकुमार यादव आणि त्याचं सेलिब्रेशन.

या सामन्यामध्ये भन्नाट फलंदाजी करत सूर्यकुमारने सर्वांची मने जिंकली. त्याचबरोबरच त्याचे सेलिब्रेशनही चर्चेत राहिले. सूर्यकुमारने कव्हर ड्राइव्हला फटका लगावत आपले अर्धशतक साजरे केले. यानंतर त्याने भारतीय संघाच्या डगआऊटकडे बॅट उंचावली.

सूर्यकुमारची कामगिरी पाहून प्रशिक्षक राहुल द्रविडने उभे राहून टाळ्या वाजवत प्रतिसाद दिला. या वेळी रोहित शर्मानेही हसत टाळ्या वाजवत सूर्यकुमारच्या कामगिरीवर आनंद व्यक्त केला. द्रविड उभा राहून टाळ्या वाजत असल्याचे आणि रोहितनेही टाळ्या वाजवून आनंद व्यक्त केल्याचे पाहून सूर्यकुमारने अगदी स्टाइलमध्ये प्रशिक्षक द्रविड तसेच अभिनंदनासाठी टाळ्या वाजवणाऱ्या सर्व संघ सहकाऱ्यांना नमस्कार करीत अभिवादन केले.

### स्ट्रँडजा स्मृती बॉक्सिंग स्पर्धा

# भारतीय खेळाडूंपुढे अवघड आव्हान

**सोफिया : वृत्तसंस्था**

बल्गेरिया येथे सुरू असलेल्या स्ट्रँडजा स्मृती बॉक्सिंग स्पर्धेच्या मुख्य फेरीची कार्यक्रमपत्रिका जाहीर करण्यात आली असून भारतीय बॉक्सिंगपटूंपुढे खडतर आव्हान असणार आहे.

निखत झरिनला (५२ किलो वजनी गट) थेट उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळाला असला तरी सुमित आणि अंजली तुषीर यांना तुलनेने अधिक यशस्वी प्रतिस्पर्ध्यांचा सामना करावा लागणार आहे. ६६ किलो वजनी गटाच्या पहिल्या फेरीत अंजलीचा दोन वेळा जागतिक स्पर्धेतील पदकविजेत्या रशियाच्या सादत दाल्गातोव्हाशी सामना होईल. पुरुषांमध्ये आकाशला (६७ किलो) पहिल्या फेरीत पुढे चाल मिळाली. परंतु सुमितला (७५ किलो) आगेकूच



करण्यासाठी जागतिक रौप्यपदक विजेत्या झामबुलात बिझहामोव्हला पराभूत करावे लागेल. यंदा १० पुरुष आणि सात महिला असे भारताचे एकूण दहा बॉक्सिंगपटू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

## गुजरात टायटन्सने लाँच केला लोगो

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

आयपीएलची नवीन फ्रेंचाइजी असलेल्या गुजरात टायटन्सचा अधिकृत लोगो जारी करण्यात आला आहे. टीम इंडियाचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्याकडे गुजरात संघाचे नेतृत्व असून आशिष नेहरा संघाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून काम पाहत आहे.

गुजरातने फ्रेंचायझीने त्यांच्या ट्विटर हँडलवरून एक व्हिडिओ ट्वीट केला आहे, ज्यामध्ये संघाचा कर्णधार हार्दिक पांड्या, प्रशिक्षक आशिष नेहरा आणि युवा फलंदाज शुबमन गिल डिजिटल अवतारात दिसत आहेत.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com